नोटीस

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/१/कावि/२९/२०१९
दिनांक-०७/०१/२०१९

प्रति,

श्रीम.कांबळे उत्तरा अनंत
"मुख्याध्यापक"
माध्यमिक विद्यालय खराळवाडी

विषय - कार्यालयीन कामकाजात निष्काळजीपणाबाबत....

तुम्ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालय खराळवाडी येथे "मुख्याध्यापक" या महत्वाच्या व जबाबदारीच्या पदावर कामकाज करीत आहात. "मुख्याध्यापक" पदाच्या कर्तव्याची तुम्हांस माहिती असणे आवश्यक आहे. मुख्याध्यापक वर्ग - ०२ चे पद असुन, वरीष्ठांच्या सूचनांचे पालन करणे व नियमानुसार कामकाज करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे.

माध्य/शि/०१/कावि/११९६/२०१८ दि.२७/१२/२०१८च्या पत्रान्वये तुम्हास समक्ष येऊन खुलासा मागवणेत आलेला होता.तुम्ही समक्ष मुख्यकार्यालयात उपस्थित राहिलेले होता. परंतु लेखी खुलासा दि.०४/०१/२०१९ रोजी सादर केलेला आहे.तुम्ही दि.०४/०१/२०१९ च्या पत्रामध्ये अ.क्र.०१ मध्ये नमुद केले की १२ वर्ष आदेशामध्ये दि. २६/११/२००२ ते २५/११/२०१४ असा कालावधी नमुद आहे.सदर आदेशामध्ये असा कालावधीचा कुठेही उल्लेख केलेला नाही. याचाच अर्थ तुम्ही १२ वर्षाचा आदेश पुर्ण पणे वाचलेला नाही. अ.क्र.०२ श्री.गांजुरे यांच्या म्हणण्यानुसार १२ वर्षाचा आदेश निर्गत केलेले नाहीत. सेवासात्यत व १२ वर्ष हे विषय पुर्ण पणे वेगळे आहेत. सेवासात्यत आदेशाचे तुम्ही अवलोकन केलेचे दिसुन येत नाही. श्री.गांजुरे यांचे सेवानोंद पुस्तक तसेच त्यामधील नोंदीशी श्री.गांजुरे यांचा काहीही संबध नसताना त्यांना त्याची विचारणा करतात सदर बाब विद्यालयाच्या कार्यालयाला अशोभनीय आहे.

माध्यमिक विभागातील सहा.शिक्षकांना १२ वर्षाचा लाभ किंवा इतर कोणताही आर्थीक लाभ देणेचे कामकाज मुख्यकार्यालयातुन चालते, त्या बाबत कधी पासुन द्यावयाचा हे मुख्यकार्यालय अंतर्गत विषय आहे. परंतु विद्यालयाला आदेश प्राप्त झालेपासुन त्वरीत नियमानुसार वेतननिश्चिती करून फरकाची बिले मुख्यकार्यालयास सादर करणे हे विद्यालयाचे काम आहे.किंवा कसे याबाबत खुलासा सादर करणेत यावा. विद्यालयातील ०२ कर्मचारी यांचे वेतननिश्चिती करून फरक अदा करणेत आलेला आहे.श्री.गांजुरे यांच्या कामकाजास विंलब का? श्री.गांजुरे हे विद्यालयात १२/०८/२०१६ रोजी आलेचे त्यांच्या सेवानोंदपुस्तकावरून दिसुन येत आहे.व १२ वर्षाचा आदेश दि.१७/११/२०१७ रोजी मा.अतिरिक्त आयुक्तसो. यांच्या स्वाक्षरीने निर्गत करणेत आलेले आहेत. त्यामुळे पुर्वीच्या विद्यालयाचा काहीही संबध येत नाही. वेतननिश्चिती आदेश तपासणे हे मुख्य कार्यालयाचे काम आहे.असे तुम्ही खुलाश्यामध्ये उल्लेख केलेला आहे.असे असल्यास मुख्याध्यापक हे पद वर्ग ०२ चे आहे.या पदाचे प्रशासकीय कामकाज काय आहे?

श्री.गांजुरे यांनी परस्पर वेतननिश्चिती करून आणली असे तुम्ही खुलाश्यामध्ये उल्लेख केलेला आहे. परंतु संबधीत शिक्षकांनी बाहेरून काम करून आणण्याचे प्रायोजन काय? तसेच मुख्यकार्यालयात बोलणे झालेले आहे. मुख्यकार्यालयाने चुकीचे काम करणेचे लेखी पत्र दिलेले आहे का?



Scanned by CamScanner

१) दुरूस्ती आदेशाचा प्रस्ताव पुर्ण पणे चुकीचा असुन मुख्याध्यापक म्हणुण तुमची स्वाक्षरी आहे.सदर प्रस्ताव दिशाभुल करणारा सादर करून आदेश होण्यापुर्वीच विद्यालयाने प्रशासन विभागात पत्र देऊन मुळ वेतनात बदल केलेचा दिसुन येत आहे.

२) श्री.गांजुरे यांची प्रथम वेतननिश्चिती विद्यालयाने केलेली नाही.असे उपरोक्त खुलाश्यामध्ये उल्लेख केलेला आहे. परंतु गांजुरे यांची प्रथम वेतननिश्चिती प्रस्तावावर खराळवाडी विद्यालयाचे मुख्याध्यापक यांची स्वाक्षरी आहे. तरी स्वाक्ष-या कोणाच्या आहेत.

३) दुरूस्ती आदेश विद्यालयात तयार केला नाही. तर दुरूस्ती आदेश मुख्य कार्यालयात पाठवणेचे प्रायोजन काय?

४) दरूस्ती आदेश प्रस्तावार तुमची स्वाक्षरी असताना श्री.गांजुरे यांना आदेशाचे कारण विचारणेचे प्रायोजन काय? तसेच विद्यालयाचे कामकाज कोणामार्फत चालते?

५) विद्यालयातील कर्मचा-यांचे मुळसेवानोंद पुस्तके कोणाच्या ताब्यात असतात.

उपरोक्त बाबींचा विचार केला असता तुम्ही विद्यालयाचे कोणतेही काम हे विद्यालयाने केलेले नाही.असे खुलाश्यामध्ये उल्लेख केलेला आहे,तर विद्यालयाचे कार्यालयीन सर्व प्रकारचे कामकाज कोण करत आहे? तसेच कार्यालयाने दिलेला लिपिक कामकाज करत नाही असे तुम्ही सांगीतले आहे.परंतु लिपिक कर्मचारी हा संपुर्णत: मुख्याध्यापकांचे नियंत्रणाखाली कामकाज करत असल्याचे त्यांचेकडुन काम करून घेणेची संपुर्ण जबाबदारी मुख्याध्यापक म्हणुण तुमचीच आहे.

तरी वरील सर्व बाबींबाबत तुमचेवर दंडात्मक कारवाई का करण्यात येउ नये, याबाबतचा स्वयंस्पष्ट लेखी खुलासा सदरची नोटीस मिळालेपासुन दोन दिवसात शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयात समक्ष सादर करणेत यावा. मुदतीत खुलासा सादर न केल्यास तसेच सदर खुलासा असमाधानकारक असल्यास तुमचेवर महाराष्ट्र महानगरपालिका कलम ५६ (२) "ड" अन्वये नियमावधीन कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

प्रत, मा.अतिरिक्त आयुक्त सो.
मा.माहितीसाठी सादर,



Scanned by CamScanner